Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
VOL- VIII ISSUE- IX SEPTEMBER 2021 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 7.149 ISSN 2349-638x

# ब्राहमो समाजाचे सामाजिक सुधारणेतील योगदान

प्रा.डॉ. आर.वी. लक्षटे
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
देगलूर महाविद्यालय देगलूर

भारताच्या सामाजिक सुधारणेचा इतिहास अत्यंत प्रगतशील व गौरशाली आहे. या इतिहासाचा प्रारंभ इ.स.पुर्वपासून ते अण्णा हजारे पर्यंतचा आहे. या इतिहास अनेक महानायक आणि त्यांच्या संघटनांनी आपले पुर्ण योगदान दिले. या योगदानाच्या आधारावरच स्वातंत्र्यानंतरचा भारताची प्रगतशील वाटचाल आहे. आधुनिक भारताच्या सामाजिक इतिहासात राजाराम मोहनरॉय व त्यांच्या ब्राहमो समाजाचे योगदान महत्वपुर्ण आहे.

प्रस्तुत लेखात राजा राममोहन रॉयच्या ब्राहमो समाजाची सामाजिक विचारसरणी व त्यांच्या कार्यप्रणालीची मांडणी भरण्यात आली. यासाठी ऐतिहासिक, वर्णनात्मक, विश्लेष्णात्मक व ग्रंथालीयन अभ्यास पध्दतीचा आधार घेण्यात आला. राजा राममोहन रॉय हे आधुनिक समाजसुधारणेचे जनक आहेत. त्यांची बांधणी त्यांनी ब्राहमो समाजाच्या माध्यमातून केली या गृहितकाच्या साहयाने करण्यात आली. समाजसुधारणेच्या इतिहासातील ब्राहमो समाजाचे योगदान समजून घेण्याच्या दृष्टीने या लेखाची उपयुक्तता आहे.

राजा राममोहन रॉयना भारतीय पुर्नजागरण चळवळीचा जनक म्हणतात. राजा राममोहन रॉय हे प्रतिभासंपन्न व्यक्तिमत्व होते. त्यांनी स्थापन केलेला ब्राहमो समाजाचा आधार पाश्चिमात्य विचारसरणी होता.ब्राहमो समाज आधुनिक भारताच्या हिंदु धर्म सुधारणेच्या इतिहासातील पहिली चळवळ होती. राजा राममोहन रॉय एक समाज सुधारक होते. ते मानवी प्रतिष्ठा,आधुनिक दृष्टीकोन व सामाजिक समतेच्या सिध्दांतावर विश्वास ठेवतात. त्यांचा एकेश्वरवादावर विश्वास होता. त्यांनी 1809 साली एकेश्वरवादाचे समर्थन करणारे पुस्तक लिहिले. वेद आणि उपनिषदाचे बंगाली भाषेत अनुवाद केला. यातून त्यांनी प्राचीन हिंदु धर्मशास्त्र एकेश्वरवादाचे समर्थन करते हे स्पष्ट केले. 1814 साली त्यांनी कलकत्यात आत्मीय सभेची स्थापना केली. मुर्तिपुजा, जातिप्रथेस विरोध, अर्थहीन रुढी-परंपरा आणि इतर सामाजिक कुप्रथांची चिकित्सा करुन त्यास विरोध केला.

सर्वच धर्म एकतेवर विश्वास करतात. हिंदु धर्मासमान इतर धर्मातील चांगल्या तत्वाचे समर्थन केले. त्यांच्या मते मनुष्याने स्वत: धार्मिक ग्रंथांचा अभ्यास करावा 1820 साली त्यांनी प्रीसेप्स ऑफ जीसस् नावाचे पुस्तक लिहिले. त्यांनी न्यु टेस्टामेंट मधील नैतिक व तात्वीक संदेशाचे समर्थन केले. तसेच त्यातील चमत्कारिक संदेश व कहान्यांना त्यापासून वेगळे करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी ख्रिश्चन धर्मातील अनेक चुकीच्या रुढी-परंपराना लोकासमोर ठेवले. या सर्व विचारांचे वहन करणाऱ्या संघटनांची बांधणी राजा राममोहन रॉयनी केली. ज्यास पुढे ब्राम्होसमाज या नावाने ओहखले जाते. त्यांनी समाजिक सुधारणेच्या माध्यमातून लोकांत राजकीय जागृती केली. लोकांत राष्ट्रप्रेमाची भावना जागृत केली.

राजा राममोहन रॉयनी सामाजिक सुधारणेचा प्रारंभ सतीप्रथेस कडाडून विरोध करुन केला. 1818 साली त्यांनी आपल्या सतीप्रथा विरोधी अभियानाचा प्रारंभ केला. या सामाजिक कुप्रथेच्या विरोधात त्यांनी लोकमत संघटीत व जागृत केले. प्राचीन हिंदू धर्मशास्त्र सतीप्रथेला मान्यता देत नाहीत. हे त्यांनी धर्माच्या ठेकेदारास तर्कशास्त्र, मानवता, नैतिकता आणि दयाभावाच्या आधारे पटवून दिले. तसेच त्यांना या प्रथेविरुध्द आवाज उठवण्यासठी प्रोत्साहित केले, त्यांनी विधवा स्त्री व तिच्या कुटुंबियासह अनेकांशी चर्चा करुन त्यांना समजावून सती होण्यापासून रोखण्याचे अथक प्रयत्न केले. त्यांनी समविचारी लोकांचे संघटना बनवले. या संघटनामार्फत सती प्रथेचे समर्थन करणाऱ्या लोकांवर कडक नियंत्रण ठेवले जे लोक अधंश्रध्देच्या नावाखाली किंवा सोन्याच्या हव्यासापोटी, विधवा स्त्रीयांसाठी जाण्यास प्रेरित करत होते. अशा लोकांचे वर्तन समाजासमोर उघडकीस आणले. राजा राममोहन रॉय यांच्या अथक प्रयत्नामुळेच सतीप्रथा बंद होण्याच्या दिशेने सकारात्मक प्रयत्न झाले. या अमानवीय प्रथेला बंद करण्यासाठी शासनाने कठोर कायदे करावेत. अशी विनंती शासनाकडे केली. यांच्या प्रयत्नामुळे ब्रिटीश शासनात सतीप्रथेविरुध्द जागृती आली. या जागृतीमुळेच ब्रिटीश शासनाचे 1829 ला लॉर्ड विनियम बैटिक यांनी सतीप्रथा विरोधी कायदा बनवला. या कायदयाने सतीप्रथेस बेकायदा घोषित केले.

राजा राममोहन रॉयनी स्त्रीयांच्या दुर्बल स्थितीचा कट्टर विरोध केला स्त्रिया वाईट सामाजिक स्थिती आणि त्यांच्या सोबत होणाऱ्या भेदभावामुळे राजा राममोहन रॉय अत्यंत दु:खी होते. त्यामुळे त्यांनी स्त्रियांना संपत्तीचा अधिकार देण्याची मागणी केली.

तसेच स्त्रियांना संपत्तीचा अधिकार देण्याची मागणी केली. तसेच स्त्रियांना संपत्तीचा अधिकार देण्याची मागणी केली. तसोच स्त्रियांना शिक्षण दयावे विधवा विवाह करावे, सती प्रथेचा अंत करावा बहुपत्नी विवाहास अवैद्य घोषित कावे या मताचे होते. स्त्रियांच्या सामाजिक स्थितीत सुधारणा करावे या मताचे होते. स्त्रियांच्या सामाजिक स्थितीत सुधारणा करण्यासाठी वडीलोपार्जित व वारश्याने चालत आलेल्या संपत्तीत अधिकार दयावा. रॉयनी1817 ला कलकत्यात स्वखर्चाने इंग्रजी माध्यमाची शाळा स्थापना केली. ज्यात भारतीय शिक्षण, प्राश्चीमात्य भैतिकशास्त्र आणि सामाजिक शास्त्राचे शिक्षण दिले जात. बंगाली भाषेला समृध्द ज रावे म्हजू-न बंजला व्याकरणाची निर्मिती करुन बंगाली पद्य निर्माण केले. राजा राममोहन रॉय यांचे विविध भाषेवर प्रभुत्व होते. अनेक भाषेचे ज्ञा-न असल्यामुळे त्यांनी विभिन्न भाषेतील ग्रंथाचा अभ्यास केला. रॉय-ना भारतीय पत्रकारितेचा जनक म्हणतात. कारण त्यांनी बंगाली, हिंदी आणि इंग्रजी या भाषेतील अनेक पत्र व पत्रिकांचे प्रकाशन व संपादक म्हजू-न ज ार्य जे ले.

या मध्यमातून ते भारतीय जनतेला शिक्षणाचे धडे देत या पत्रकाच्या साहयाने ते भारतीय जनतेच्या दु:ख व समस्यांना शासनाच्या पुढे मांउत असत. राजा राममोहन रॉयनी बंगालमधील जमीनदारी व्यवस्थेमार्फत होणाऱ्या शोषणाची निंदा केली तसेच संस्थानिकाकडून लावण्यात येणाऱ्या कराची मात्रा निश्चित करण्याची मागणी केली. करमुक्त भुमिवर पुन्हा कर लावण्याच्या शासनाच्या प्रयत्नास विरोध केला. निर्यातीवरील व्यापाऱ्यांच्या विशेषाधिकारास नष्ट करण्यासठी शासनास पत्रक दिले.

भारतातील उच्च सेवांचे भारतीयकरण आणि कायपालिकेस न्यायपालिकेपासून वेगळे करण्याच्या मागणीचे समर्थन केले. तसेच न्यायालयीन खटल्यांची सुनावणी जूरी प्रथेच्या माध्यमातुन करावी आणि भारतीय व युरोपीय यांच्यात न्यायालयीन समानतेची मागणी जे ली

राजा राममोहन रॉयचा राजकीय दृष्टिकोन आंतरराष्ट्रियता वादी होता त्यांनी अनेक राष्ट्रांच्या पाररचरिक सहकार्यावर दृढ विश्वास व्यक्त केला. आंतरराष्ट्रिय स्वातंत्र्य, समता व न्यायाचे समर्थक होते. यावरुन हे स्पष्ट होते की, त्यांना तत्कालीन आंतरराष्ट्रीय परिस्थितीची अधिक व चांगली समझ होती. त्यांमुळेच त्यांनी स्पेन, अमेरिकेतील स्वातंत्र्य चळवळीचे समर्थन केले. आयर्लडच्या जमीनदारामार्फत शेतक-यावर होजा-या अत्याचाराला विरोध केला.

राजा राममोहन यांनी ऑगस्ट 1828 मध्ये ब्राहमो सभेची निर्मिती केली. ज्याचे कांही विशिष्ट कालावधीनंतर ब्राहमो समाज असे नामकरण करण्यात आले ब्राहमो समाजानुसार ईश्वर एकच आहे. ईश्वर हाच सर्व सद्गुणांचा केंद्र बिंदु आहे ईश्वर निर्गुण व निराकार आहे. हिंदू धर्माचे शुध्दीकरण एकेश्वरवाद निर्गुण व निराकार आहे. हिंदू धर्माचे शुध्दीकरण एकेश्वरवाद निर्गुण परमात्म्यावर विश्वास ब्राहमो समाजाचा त्रमुख उद्दिष्ट आहे. त्यांचा हा उ प्रदेश तर्कशास्त्र वेद आणि उपनिपदाच्या शिक्षेवर आधारित आहे. ब्राहमो समाज सर्व धर्म समभावावर विश्वास ठेवतो त्यांच्या मते सर्व धर्मात सत्य समाविष्ट आहे. प्रत्येक व्यक्तिने आपल्या धर्मासोबत सर्व धर्माचा आदर करावा. ब्राहमो समाज नैतिकतेवर भर देतो ब्राहमो समाजाच्या सर्वकार्यात अहिंसेला पुरण्य स्थान होते ब्राहमो समाजाच्या माध्यामातुन नव्या धर्माची स्थापना भरण्याचा उद्देश राजा राममोहन रॉयचा नव्हता. परंतु विविध वाईट बाबींना स्था-न देज्या-या हिंदू धर्याचे शुध्दीकरण करण्याचा त्यांचा मानस होता. तत्कालीन हिंदू परंपराबादयपरंपरावादयांनी राजा राममोहन रॉयच्या सुधारणावादी व प्रगतशील विचाराचा कटटर विरोध जे ला खालील मुदयाच्या आधारे ब्राहमो समाजाचे प्रमुख तत्व स्पष्ट करग येतात बहुदेवोपासना व मुर्तिपुजेला विरोध, बहुपलीत्व व सती प्रथेला विरोध, विधवा विवाहाचे समर्थन, बाल विवाहाला विरोध, सर्वधर्मसमभाव, भेदभावाला विरोध ब्राहमो समाजाने आपल्या सिध्दांताच्या आधारे अंधयध्देवर प्रहार केले ब्राहमो समाजाने हिंदूमार्फत मान्य असणाचा परदेश यात्रेला धर्य विरोधी मानण्याच्या विचाराला विरोध केला. स्त्रियांच्या विकासा आड येणाणा-या प्रत्येक प्रथेला विरोध केला अशाप्रकारे विविध क्षेत्रात ब्राहमो समाज व राजा राममोहन रॉयने कार्य केले. या कार्यामुळेच भारताच्या समाज सुधारणेच्या इतिहासात ते अविस्मरणीय, व प्रशंसनीय व प्रेरणादायी राहिले

राजा राममोहन रॉयनंतर ब्राहमो समाजाची दशा व दिशा जाणून घेणे या लेखाचा हेतु आाहे. या हेतुच्या पुर्तीच्या दिशेने विचार ज रता खालील बाबी स्पष्ट होतात राजा राममोहन रॉयच्या मृत्यूनंतर ब्राहमो समाजाची धुरा व सुत्रे महर्षी देवेद्रनाथ टॅगोरच्या हाती आली देवेद्रनाथ टॅगोर 1842 साली ब्राहमो समाजात सहभागी झालो यांच्या व्यक्तिमत्वात तत्कालीन भारतीय परिस्थिती आणि पाश्चीमात्य ज्ञा-न व विचारांच्या समन्वय होता त्यांनी ब्राहमो समाजाला नवी दिशा, चैतन्य व स्वरुप प्राप्त करुन दिले. यामुळे ब्राहमो समाजाच्या सदस्य संज्येत व लोकप्रियतेत वाढ झाली. परिणामता ईश्वराचंद विद्यासागर यांच्यासारखे श्रेष्ठ विचारवंत या समाजाशी जुडले गेले देवेद्रनाथ टागोरांनी हिंदू धर्मात सुधरना करण्या सोबतच ब्राहमो समाजाला ख्रिश्चन आणि वैदिका कर्मकाडापासून वाचवण्यासाठी प्रयत्न केले ब्राहमो समाजावर हिंदूवादी रुठीवादी व ख्रिचन पादरीकडुन होणा-या आक्रमणांना थांबवण्याचे व त्यास उत्तर देण्याचे कार्य देवेद्रनाथ टागोराने केले. देवेद्रनाथ टागोर यांच्या नेतृत्वात ब्राहमो समाजाने विधवा विवाहाचे समर्थन, स्त्रि शिक्षणास प्राधान्य, बहुपलीत्वाच्या प्रथेचे उच्चाटन आणि आवडबरयफक्त धार्मिक कर्मकांडांना संपवण्याचे कार्य केले देवेद्रनाथ टागोरसोबतच केशवचंद्र सेन ब्राहमो समाजाच्या कार्याशी जुडले. केशवचंद्र सेन

यांच्या वाक्चातुर्य आणि उदारमतवादी विचारामुळे ब्राहमो समाज लोकप्रिय बनला इश्वरचंद्र सेनच्या प्रयत्नामुळे ब्राहमो समाज लोकप्रिय बनला इश्वरचंद्र सेनच्या प्रयत्नामुळे ब्राहमो समाजाच्या शाखा बंगाल प्रांतासह संसुक्त प्रांत, मुंबई मद्रास व पंजाब प्रांतातही सुरु झाल्या. परंतु या कार्यास लनापच विहन निर्माज झाले. केशवचंद्र सेन व द्रवेद्रनाथ टागोर यांच्यात मतभेद निर्माण झाले कारण केशवचंद्र सेन ब्राहमो समाजाचे आंतरराष्ट्रीय करण, ब्राहमो समाजात सर्व धर्माच्या तत्वाचा समावेश आणि आंतरजातीय विाहास प्रोत्साहन देणे इत्यादी मुदयावर भर देत असत ज्यामुळे या रोधात मत भेद निर्माण झाले 1866 साली केशव चंद्र सेन यांनी भारतीय ब्राहमो समाजाचया नावाने एका नव्या सभेची स्थापना केली. यानंतर देवेद्रनाथ टागोरच्या ब्राहमो समजाला जुनी ब्राह्मो समाज या नावाने ओळखु लागले.

अशाप्रकारे राजा राममोहन रॉय पासुन प्रारंभ झालेल्या ब्राह्मो समाजाने केशवचंद्र सेन, देवेद्रनाथ टागोर दयाल सिंह दुस्ट यांच्यापर्यंत येवून पोहचली आधुनिक भारताच्या सामाजिक इतिहासात समाजात नवचैत्न निर्माण करुन त्यास आधुनिक व समजाधिष्ठित विचाराची ओळख करुन देण्याचे कार्य ब्राह्मो समाजाने ेले ब्राह्मो समाजाच्या या कार्याचा परिणाम नंतरच्या सामजिक सुधारणा व इतर चळवळीवर झाला. भारताच्या ससामाजिक सुधारणाकडे दुर्लक्ष करता येत नाही. यातील ब-याच सामाजिक सुधारणांचा समावेश स्वांतत्र्यानंतरच्या भारतीय राज्यघनेततील अनेक तत्वात आहे. तसेच ब्राह्मो समाजाच्या विचारांना व्यवहारात आणण्यासाठी भारत शासनाने अनेक कार्य केले.

**संदर्भ ग्रंथ :**

1. Rajkiya Vicharacha Itihas : Dr. N.Y.Dole Continental Publication Pune-2009
2. Bhartiya Rajnitik Vicharak - Dr.Pukhraj Jain - Sahitya Bhavan Publication Agra-2002
3. Rajkiya Sidhant - Dr.Suvarna Gudge - Benke इPrashant Publication -2014
4. Bhartiya Rajniti Vidyan Patrika - July- Dec. - 2014 - Sampadak - Chandraprakash Barthval -

Dr. Mohan N. Khatal
Principal
A. V. Education Society's
Degloor College,Degloor Dist Nanded